आजचे कार्यक्रम

* यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे व प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण समारंभ सकाळी साडेअकरा वाजता विद्यापीठात आयोजित करण्यात आलेला आहे.

* यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने विशाखा काव्य पुरस्कार वितरण समारंभ सायंकाळी चार वाजता विद्यापीठाच्या शैक्षणिक सभागृहात कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते प्र-कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन आणि कुलसचिव दिलीप भरड हे उपस्थित राहणार.

* नाशिक डिस्ट्रिक्ट ऑल गेम्स असोसिएशन, कालिका मंदिर, यशवंत व्यायामशाळा यांच्यातर्फे २३ ते ३०जून दरम्यान क्रीडा सप्ताहाचा पारितोषिक वितरण समारंभ कालिका मंदिर ट्रस्टच्या हॉलमध्ये सायंकाळी साडे पाचला होणार आहे.

* आज मनसेचा जल्लोष नाशिकमध्ये सकाळी दहा वाजता नाशिक मुख्यालय असलेल्या राजगड कार्यालयावर मनसैनिक जल्लोष साजरा करणार आहे, अशी माहिती पक्षाच्या वतीने देण्यात आली.

स्थानिक भाव

सोने (प्रति १० ग्रॅम)	
२४ कॅरेट	९५,८००
२२ कॅरेट	८८,१४०
चांदी (प्रति किलो)	
१,०७,०००	

हिंदी सक्तीवरून सरकारची माघार

(पान १ वरून) बैठकीत दोन्ही शासन निर्णय रद्द करून नवी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेऊन मुख्यमंत्री फडणवीस यांनी या आंदोलनातील हवा काढून घेतली आहे. यावेळी फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर हल्ला चढवला.

२१ सप्टेंबर २०२० ला तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी हे शैक्षणिक धोरण कशा प्रकारे लागू करायचे यासाठी एक तज्ञ समिती नियुक्त केली. नामवंत शास्त्रज्ञ डॉ.रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली १८ लोकांची ही समिती होती. यात ठाकरे यांच्या पक्षाचे उपनेते विजय कदम यांचाही समावेश होता. या समितीने १०१ पानांचा अहवाल सादर केला.

शिंदे यांचा आदित्य यांना टोला

आमच्यावर महाविकास आघाडीचे नेते भ्रष्टाचाराचे आरोप करतात. पण सध्या मुंबईत अनेक घोटाळ्यांची चौकशी सुरू आहे. खिचडी घोटाळा, बॉडीबॅग घोटाळा या कोविड काळातील घोटाळ्यांची चौकशी तर सुरूच आहे. पण मिठी नदी भ्रष्टाचाराची पण चौकशी सुरू आहे. त्यात दिनो मोरियाची पण चौकशी सुरू आहे. आता त्या दिनो मोरियाने जर तोंड उघडले तर कोणाचा मोरया होईल हे दिसणार आहे, असा टोला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आदित्य ठाकरे यांचे नाव न घेता लगावला.

मोर्चाही रद्द करा : पवार

आम्ही हिंदीबाबतचे दोन्ही शासन निर्णय रद्द केले आहेत. आता राज आणि उद्धव ठाकरे यांना मोर्चा काढण्याचे कारणच उरलेले नाही. त्यामुळे मुंबईतील मराठी माणसाला वेठीस न धरता त्यांनी ५ तारखेचा हा मोर्चा रद्द करावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. हा निर्णय रद्द झाल्याने मराठी माणसानेही या मोर्चाला प्रतिसाद देऊ नये, असेही पवार म्हणाले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी ३,६०० कोटी रूपये डीबीटीवर पाठवले आहेत. सोमवारी बहिणींच्या खात्यात पैसे जमा होतील, अशी माहितीही पवार यांनी दिली.

पुरी रथयात्रेत चेंगराचेंगरी

(पान १ वरून) गर्दीत चिरडले गेले. चेंगराचेंगरीची दुर्घटना घडली त्या ठिकाणी पुरेसे पोलीस अथवा सुरक्षा दल तैनात नव्हते, अशी माहिती पुढे आली आहे. भगवान बलभद्र आणि सुभद्रा यांचे रथ आधीच श्रद्धाबली (अंतिम बिंदू) येथे पोहोचले होते. त्यानंतर, भगवान जगन्नाथाचा रथ गुंडीचा मंदिरात त्यांच्या मावशीच्या घरी पोहोचला. शुक्रवारी (दि.२७) देवी सुभद्राच्या रथाभोवती गर्दी वाढल्याने ६२५ भाविकांची प्रकृती खालावली होती. त्यातील ७० जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. ९ जणांची प्रकृती चिंताजनक आहे. शुक्रवारी दुपारी ४ वाजता पुरीत भगवान जगन्नाथ रथयात्रा सुरू झाली. सर्वप्रथम भगवान बलभद्रचा रथ ओढण्यात आला. त्यानंतर सुभद्रा आणि जगन्नाथ यांचे रथ ओढण्यात आले. पहिल्या दिवशी बलभद्रचा रथ २०० मीटरपर्यंत ओढण्यात आला.

जिल्हाधिकारी, एसपींची बदली

पुरी रथयात्रेतील चेंगराचेंगरीनंतर राज्य सरकारने पुरीचे जिल्हाधिकारी आणि एसपी यांच्यावर बदलीची कारवाई केली. कर्तव्यात निष्काळजीपणा केल्याबद्दल डीसीपी विष्णू पती आणि कमांडंट अजय पाधी यांना निलंबित करण्यात आले. चंचल राणा यांची नवे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. पिनाक मिश्रा यांनी नवे एसपी म्हणून पदभार स्वीकारला.

मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत

मृत भाविकाच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २५ लाख रुपयांची आर्थिक मदत ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांनी जाहीर केली आहे. विकास आयुक्तांच्या देखरेखीखाली प्रशासकीय चौकशीचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. दरम्यान रथयात्रेच्या सुरक्षेतील त्रुटीची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे माझी यांनी सांगितले.

महायुती सरकार असंवेदनशील

(पान १ वरून) तर कोण पालकमंत्री बनणार यावरून हे लोक भांडतात. 'माझा फंड यांनी चोरला' असे म्हणत मुख्यमंत्र्यांसमोर जाहीरपणे सांगतात, असे आदित्य ठाकरे म्हणाले. कदाचित त्यांच्यामध्ये समन्वयाची गरज आहे. म्हणून आम्ही आपण त्यांच्या चहापानाला जायचे नाही, असा निर्णय घेतला. निदान चहापानाच्या कार्यक्रमात तरी ते एकमेकांची तोंडे बघतील, असा टोला ठाकरे यांनी लगावला. केंद्रीय मंत्री नारायण राणे खून करूनच मोठे झाले, असे खळबळजनक वक्तव्य शिंदे गटाचे मंत्री भरत गोगावले यांनी केले आहे. या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आदित्य ठाकरे म्हणाले की, हे मंत्री खून करून पंतप्रधानांच्या बाजूला मंत्रिमंडळात बसत असतील तर पंतप्रधानांच्या सुरक्षेला किती मोठा धोका त्यांनी निर्माण केला आहे. एखादा जबाबदार मंत्री केंद्रीय मंत्र्यांच्या विरोधात वक्तव्य करू शकतो. अशावेळेस पोलिसांनी बोलावून त्यांचा जबाव घेतला पाहिजे. तुमच्याकडे नक्की काय माहिती आहे याची चौकशी केली पाहिजे. कोणते खून झाले आहेत याची चौकशी केली पाहिजे, असे ठाकरे म्हणाले.

नव्या दुचाकीसोबत दोन हेल्मेट अनिवार्य

(पान १ वरून) दुचाकी खरेदी करणाऱ्या ग्राहकाला दोन हेल्मेट देणे सक्तीचे करण्यात आले आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने नव्या नियमांसाठी केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये महत्त्वपूर्ण बदल प्रस्तावित केले आहेत. अंतिम अधिसूचना प्राप्त झाल्यानंतर तीन महिन्यांत नवे नियम अनिवार्य होतील. त्यानंतर रस्त्यावर दुचाकीचालक आणि सोबतच्या व्यक्तीलासुद्धा हेल्मेट घालण्याची सक्तीची होणार असल्याची चिन्हे आहेत. देशात १ जानेवारी २०२६ पासून नवीन एल २ श्रेणीतील दुचाकी वाहने, ज्यात ५० सीसीहून जास्त इंजिन क्षमता वा ५० किमी/प्रति तासाहून अधिक गती असलेल्या दुचाकी आणि स्कूटरला आता अँट-लॉक ब्रेकिंग सिस्टीम (एबीएस) लावावे लागेल. त्यामुळे अपघातातून मोठे नुकसान होणार नाही. जीवित हानी टाळता येईल. अचानक ब्रेक लावल्यामुळे काही घटनांमध्ये दुचाकीस्वार तोंडावर वा डोक्यावर आपटून त्यांची जीवित हानी होत असल्याची प्रकरणे समोर आली होती.

हरकती मागावल्या

प्रस्तावित नियमांना अंतिम रूप देण्यापूर्वी रस्ते वाहतूक मंत्रालयाने देशभरातून त्यावर हरकती आणि सूचना मागवल्या आहेत. त्यासाठी ३० दिवसांचा कालावधी दिला आहे. या काळात दुचाकीस्वारांना त्यांच्या हरकती, मते आणि सूचना परिवहन मंत्रालयाला comments-morthgov.in या ईमेलवर मांडता येतील.

थोडी शिस्त, काहीशी बेशिस्त!

(पान १ वरून) २०२५ मध्ये पावसाळ्यापूर्वीच हरिहर गडावरील पर्यटनासंदर्भात 'रील्स व्हायरल' झाल्याने जूनच्या पहिल्या आठवड्यात धोकादायक पर्यटनाची भीती दाटली. त्यामुळे गत आठवड्यात पर्यटनाच्या दोन दिवसांपूर्वी नाव नोंदणी करुन सहाशे पर्यटकांना परवानगी देण्याचा निर्णय नाशिक पश्चिम वन विभागाने घेतला.

त्यानुसार यंदा उपवनसंरक्षक सिद्धेश सावर्डेकर यांच्या आदेशान्वये वन परिक्षेत्र अधिकारी शेखर देवकर यांच्या पथकाने २९ जून रोजी पहाटेपासूनच गडावर जाणाऱ्या तीन स्वतंत्र वाटांचे नियंत्रण हाती घेतले. .

दृष्टीक्षेपात

- दुपारी १ पर्यंत २२० पर्यटक गड सर करुन उतरले.
- गडावर 'होल्डिंग स्पॉट'; त्यामुळे गर्दी नियंत्रित.
- पायरीधर येथे वनरक्षक तैनात; दोन पायऱ्यांनंतर एक पर्यटक.
- सायंकाळी ५ पर्यंत सर्व पर्यटक गडाच्या पायथ्याशी उतरले.
- पर्यटकांसोबत गडाच्या माथ्यावरही वन कर्मचारी.
- एकाच ठिकाणी थांबण्यासह रील्स बनविण्यास मज्जाव.

वनरक्षक येथे तैनात

गडाचा मुख्य पायथा असलेल्या हर्षेवाडीत सर्व पर्यटकांची तपासणी करण्यात आली. यासह झारवड आणि निरगुडपाडा येथील रस्त्यांवरही वनरक्षक तैनात होते. वेताळ टेकडी, बालेकिल्ला, पायरीधर या भागात पर्यटकांना थांबण्यास मज्जाव करण्यात आला. त्यामुळे कोणताही गोंधळ झाला नाही. दरम्यान, सन २०२२ मध्ये येथे उसळलेल्या गर्दीमुळे प्रशासन खडबडून जागे झाले होते. त्यामुळेच पूर्वपरवानगी बंधनकारक केल्याचा पहिल्यांदा 'प्रयोग' त्यावेळी राबवण्यात आला होता. नागपूर वन मुख्यालयात सविस्तर अहवाल देत एक 'ॲप' तयार होऊन ई-नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्याचा निर्णय झाला होता. मात्र, 'ॲप' कार्यान्वित झाले नाही.

हिंदी सक्ती आदेशाची प्रतिकात्मक होळी

(पान १ वरून) काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष यांनीही पाठिंबा दिला आहे.

तत्पूर्वी आज आझाद मैदानात हिंदी सक्ती निर्णयाविरोधात आंदोलन पुकारण्यात आले. आंदोलनात उद्धव ठाकरे आणि त्यांच्या पक्षाचे दिग्गज नेते व कार्यकर्ते सहभागी झाले होते. आमदार आदित्य ठाकरे, शिवसेना खासदार संजय राऊत, खासदार अरविंद सावंत, अनिल देसाई, सुभाष देसाई आदी नेते तसेच कलाकार मंडळी आंदोलनात सहभागी झाली होती. यावेळी हिंदी भाषासक्तीच्या शासन निर्णयाची प्रतिकात्मक होळी करण्यात आली.

उद्धव ठाकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला. आम्ही दबाव आणू इच्छित नाहीत. आम्ही हे स्वीकारतच नाही. ते एखादी गोष्ट लादणार असतील तर आम्ही आमच्या वतीने तो विषय संपवला आहे. आम्ही त्या शासन निर्णयाची होळी केली आहे. त्यामुळे तो जीआर आहे, असे मानण्याचे कारण नाही. आम्ही हिंदीची सक्ती लादू देणार नाही, असे ठशकरे म्हणाले. मोर्चा काढण्याची वेळ येऊ देणार नाही, असे अजित पवार यांनी सांगितले. ही आनंदाची गोष्ट आहे. कोणीतरी एक धाडस दाखवत आहे. सर्वच जण गुलाम झालेले नाहीत. त्याबद्दल कौतुक आहे, पण त्याचवेळी अभ्यास न करता हा निर्णय अचानक कोणी आणि कशासाठी लादला? हेदखील अजित पवारांनी जाहीर केल्यास बरे होईल. आम्ही त्यावेळेला अभ्यास केला, पण त्या अभ्यासाचे काय झाले हे कुणी सांगत नाही, असेही ठाकरे म्हणाले. येत्या ५ जुलैचा मोर्चा भव्य नाहीच तर महाभव्य मोर्चा असेल, असे सूचक विधान उद्धव ठाकरे यांनी केले. दरम्यान आंदोलनापूर्वी एका बैठकीचे आयोजन करण्यात आले. बैठकीला मराठी अभ्यास केंद्राच्या प्रमुखांसह इतर समविचारी संघटनांचे प्रतिनिधी आणि उद्धव ठाकरे यांची उपस्थिती होती.

शब्दकोडे : २८८



आडवे शब्द : १) प्रजाजन ३) गडीमाणसे ९) गोधडी १०) फणसाचा एक प्रकार ११) कर्ज घेणारा १३) धैर्य, हिम्मत १५) चाळीस शेर १७) सरसरीत १९) शिकारीचा प्राणी २१) नवाकोरा २३) अबोलीच्या फुलांची माळ २५) हजार किलो २६) मच्छर २७) सहाय्य २९) वर्ष, साल ३०) तारण ३२) जोराचा अघात, घाव ३३) आकाश ३४) मोठा हातोडा ३५) न थांबता ३७) नवप्रवेशित ४०) मदन ४२) जागृती ४३) येऊन पोहोचणे ४५) नाकारण्याचा हक्क ४६) मुसलमानांची प्रार्थना पद्धत ४८) कोळशाचा भूगा ४९) मासा पकडण्याचे एक साधन ५०) उंदरासारखा पण लांब तोंडाचा छोटा प्राणी ५१) वस्ती, राहणे ५२) तपासणीस ५४) पळून जाणे ५५) मालाची विक्री ५७) सत्वांश ५९) फोडातील द्रव ६०) निमग्न, गुंग ६१) दिवस ६२) आठवड्यातील तीन दिवसांची नावे ६७) धमकी, धाप ६८) बारीक मऊ केस ६९) वाणी, बोलणे

उभेशब्द : १) होडी २) निरूपयोगी ३) एक पालेभाजी ४) वेदना ५) बारीक खिळे ६) ललाट ७) ऋण ८) वाईट प्रकारचे मंत्रतंत्र ११) किंचीत कडू चव १२) किंमत १४) फसविले जाणे १६) भरीवच्या विरूद्ध १७) गवताचे रूंद पान १८) मातीचा कण २०) आपले राष्ट्रगीत २२) अस्वल २४) गाढव २७) थोर, मोठा २८) दार ३१) अगामी काळ ३३) नम्र वाकलेला ३६) गादीवर बसलेला राजा ३८) अतिशय उंच इमारत ३९) उपकार ४१) विष ४३) चालु दिवस ४४) सुंदर, मन हरणकरणारे ४५) नगरचा रहिवासी ४७) पंडू राजाच्या शेवटच्या बायकोचे नाव ४८) अफूचे बी ५१) एक पाताळ ५३) लेखणी ५४) प्रांत ५६) पाढे, पाढ्याची उजळणी ५८) सुर्याचे एक नाव ६१) शस्त्राचा घाव ६३) दात ६४) चंद्र ६५) आवाज, कीर्ती ६६) हिस्सा, भाग

शब्दकोड२८७चे उत्तर